आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७ .०० वाजता

४ ऑगस्ट २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- राज्याच्या विविध भागात पावसाचा जोर/ अनेक ठिकाणी धरणातल्या पाण्याचा विसर्ग, पुणे जिल्ह्यात अतिवृष्टीचा इशारा लक्षात घेता सतर्क राहण्याच्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या प्रशासनाला सूचना.
- ९८व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचं यजमानपद यंदा दिल्लीच्या सरहद संस्थेकडे
- ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या शोभना रानडे यांचं निधन
- दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात श्रीलंकेचं भारतापुढं विजयासाठी २४१ धावांचं लक्ष्य

  **आणि**
- पॅरिस ऑलिम्पिकमध्ये, पुरुष हॉकीच्या उपांत्यपूर्व फेरीत ग्रेट ब्रिटनवर मात करत भारताची उपांत्य फेरीत धडक

**<><><><><>**

मुंबईसह राज्यभरात आज पावसाचा जोर असून अनेक ठिकाणी धरणांमधला विसर्ग वाढवल्यामुळे नद्यांकाठच्या गावांमधल्या नागरिकांना प्रशासनानं सावधानतेचा इशारा दिला आहे. पुणे जिल्ह्यात खडकवासला धरणाच्या सांडव्यावरून मुठा नदी पात्रामध्ये सुरू असणारा विसर्ग वाढवून आजपासून ३५ हजार २ क्युसेक इतका केला आहे. पानशेत, वरसगाव आणि टेमघर या धरणांच्या पाणलोट क्षेत्रात, तसंच मावळ, मुळशी, वेल्हे आणि जुन्नर या तालुक्यांमध्ये मुसळधार पाऊस सुरु आहे. त्या परिसरातल्या धरणांमधूनही मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु आहे. पुणे जिल्ह्यातून कोकणात जाणारे अनेक घाटरस्ते बंद केले आहेत. पवना, इंद्रायणी आणि मुळा या नद्यांच्या पाणी पातळीत वाढ होत आहे.

नदीकाठी बचाव कार्यासाठी यंत्रणा सज्ज ठेवली असून तात्काळ मदतीसाठी राष्ट्रीय आपत्ती निवारण दलाला शहरात पाचारण केलं आहे. उजनी धरण ९० टक्क्यांहून अधिक भरलं असून सोलापूर जिल्ह्यातही भीमा नदीकाठच्या गावांना सर्तकतेचा इशारा दिला आहे.

**धुळे** जिल्ह्यातल्या पांझरा नदीच्या पाणलोट क्षेत्रात सुरू असलेल्या पावसामुळे तसंच पांझरा, मालनगाव आणि जामखेडी प्रकल्पातून पाण्याचा येवा वाढल्यानं अक्कलपाडा धरणामध्ये पाण्याच्या साठ्यात मोठ्या प्रमाणात वाढ होत आहे. त्यामुळे निम्न पांझरा मध्यम प्रकल्पातून आज दुपारी ३ हजार ५०० क्युसेक पाण्याचा विसर्ग करण्यात आला.

**नाशिक** शहरासह जिल्ह्यात पावसाची संततधार सुरूच असून गंगापूर धरणातून दुपारी चार वाजता ४ हजार क्युसेक विसर्ग वाढवला असून सायंकाळी तो सहा हजार क्युसेक इतका करण्यात येणार आहे. दारणा धरणात, भावली, पालखेड या धरणांमधून विसर्ग सुरू असून जिल्ह्यातल्या
सर्वच धरणांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. त्र्यंबकेश्वर इथं गावात आणि मंदिरात पाणी शिरलं आहे तर भाम धरणात पाण्याच्या विसर्गामुळे काकुस्ते गावात घरांमध्ये पाणी शिरलं आहे. या गावातल्या २२ कुटुंबांना अन्यत्र स्थलांतरीत केलं आहे. दरम्यान गोदावरी नदीला आलेल्या पुरात नाशिक शहरात रामकुंडाजवळ एक अभियंता पुराच्या पाण्यात वाहून गेला. अग्नीशमन दलाच्या जवानांनी शोध घेऊनही तो सापडू शकला नाही.

**अहमदनगर** जिल्ह्यात भंडारदरा आणि निळवंडे पाणलोट क्षेत्रात जोरदार पावसामुळे धरणांमधल्या पाणीसाठ्यात मोठी वाढ झाली आहे. भंडारदरा धरणातून २७ हजार क्युसेक वेगानं तर निळवंडे धरणातून ७ हजार क्युसेक वेगानं पाणी सोडलं जात आहे. यंदा पहिल्यांदाच नगर जिल्ह्यातल्या  धरणांमधून जायकवाडी

धरणाकडे पाणी सोडलं जात आहे, त्यामुळे येत्या काळात विसर्गात वाढ होण्याची शक्यता आहे.

**पालघर** जिल्ह्यात आज सकाळपासून पावसाची रिपरिप सुरु आहे. सततच्या पावसामुळे जिल्ह्यातल्या वैतरणा, पिंजाळ या नद्या दुथडी भरून वाहत असून या नद्यांनी आपली इशारा पातळी ओलांडली आहे. तर धामणी धरण, वांद्री, मोडकसागर, तानसा, मध्य वैतरणा धरण, कवडास बंधारा इत्यादी धरणांमधून पाण्याचा विसर्ग सुरु आहे.

**<><><><>**

मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सात तलावांपैकी 'हिंदुहृदय सम्राट बाळासाहेब ठाकरे मध्य वैतरणा जलाशय' आज पहाटे २ वाजून ४५ मिनिटांनी पूर्णपणे भरला. गेल्याच महिन्यात तुळशी, विहार, मोडक सागर, तानसा हे तलाव ओसंडून वाहू लागल्यानंतर त्यापाठोपाठ आज मध्य वैतरणा तलावही पूर्ण भरला आहे. गेल्या काही दिवसांत पाणलोट क्षेत्रात सातत्यानं होत असलेल्या दमदार पावसामुळे जलाशयांची पाणी पातळी झपाट्यानं  वाढली आहे. मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या सर्व ७ तलावांमध्ये मिळून ८९ टक्क्यापेक्षा जास्त इतका जलसाठा उपलब्ध आहे.

**<><><><>**

कोकण आणि घाट माथ्यावर तुरळक ठिकाणी आज जोरदार ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. विदर्भात आज तुरळक ठिकाणी जोरदार, तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम पाऊस पडण्याची शक्यता आहे. पुणे आणि सातारा जिल्ह्यांसाठी उद्यापर्यंत रेड अलर्ट दिला आहे.

**<><><><>**

भारतीय हवामान विभागानं पुणे जिल्ह्याला अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर धोकादायक भागातल्या नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवावं, त्यासाठी एनडीआरएफ, एसडीआरएफ, सैन्याची मदत घ्यावी असे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिले आहेत.

तसंच, बाधित लोकांसाठी निवारास्थाने, कपडे, जेवण इत्यादी सर्व व्यवस्था करण्यात यावी असे निर्देशही त्यांनी दिले आहेत. खडकवासला धरणातला विसर्ग दिवसा वाढवून पाणीसाठा ६५ टक्क्यांवर आणावा, जेणेकरून रात्रीच्यावेळी पाऊस झाला, तर नदीपात्रात अधिक विसर्ग करावा लागणार नाही, अशी सूचना मुख्यमंत्र्यांनी दिली. तसंच महापालिकेने ध्वनिक्षेपक आणि समाज माध्यमांद्वारे नागरिकांना खबरदारी घ्यायच्या सूचना द्याव्यात, आणि वेळोवेळी पूरपरिस्थितीची माहिती द्यावी, असं आवाहनही त्यांनी अधिकाऱ्यांना केलं.

जिल्ह्यातल्या अनेक नद्यांच्या पाणी पातळीत झालेली वाढ आणि त्यामुळे या नद्यांवरच्या धरणांमधून वाढवलेल्या पाण्याच्या विसर्गाच्या पार्श्वभूमीवर उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे संपर्क साधून पुणे आणि पिंपरी चिंचवड शहरांमधल्या पूरपरिस्थितीचा आज आढावा घेतला. जिल्ह्यातील आपत्ती व्यवस्थापन यंत्रणा सज्ज ठेवण्याचे आणि नदीकाठच्या सखल भागातील नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश पवार यांनी दिले. तसंच प्रशासन नागरिकांच्या मदतीसाठी आणि सुरक्षेसाठी कार्यरत असून नदीपात्रापासून दूर रहात प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही उपमुख्यमंत्री पवार यांनी केले आहे.

**<><><><><>**

९८ वं अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन यंदा दिल्लीच्या सरहद संस्थेत होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळानं आज मुंबई

मराठी साहित्य संघ इथं झालेल्या बैठकीत हा निर्णय घेतला. या संमेलनासाठी एकूण सात संस्थांनी निमंत्रण दिलं होतं. त्यापैकी महाराष्ट्र साहित्य परिषद पुणे या संस्थेची इचलकरंजी शाखा, नॅशनल लायब्ररी, मुंबई आणि दिल्लीच्या सरहद या संस्थांना मंडळाच्या स्थळ निवड समितीनं भेट दिली होती. संमेलनासाठी जागा, निवास व्यवस्था, संस्थेचे मनुष्यबळ, पुस्तक प्रदर्शनाची जागा आदी मुद्द्यांचा विचार करून सरहद संस्थेची निवड केल्याची माहिती महामंडळानं दिली आहे.

<><><><><>

ज्येष्ठ गांधीवादी कार्यकर्त्या शोभना रानडे यांचं आज सकाळी पुण्यात  निधन झालं. त्या १०० वर्षांच्या होत्या. शोभना रानडे यांनी निराधार महिला आणि मुलांसाठी समाजकार्य केलं. भारत सरकारनं २०११ मध्ये त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल घेऊन त्यांना पद्मभूषण पुरस्कार देऊन सन्मानित केलं होतं.

पुण्यात आगा खान पॅलेस इथं गांधी नॅशनल मेमोरियल सोसायटी आणि प्रशिक्षणासाठी महिलांकरिता एक संस्था स्थापन करण्यात त्यांनी मदत केली. बालग्राम महाराष्ट्र नावानं एक मुलांचं गाव त्यांनी सुरू केलं त्याद्वारे शेकडो अनाथ मुलांना आसरा मिळाला. गांधी नॅशनल मेमोरियल सोसायटीच्या माध्यमातून गंगा वाचवा चळवळीत शोभना रानडे यांचा सक्रिय सहभाग होता.

<><><><><>

कोलंबो इथं सुरू असलेल्या दुसऱ्या एकदिवसीय क्रिकेट सामन्यात श्रीलंकेनं भारतापुढं विजयासाठी २४१ धावांचं लक्ष्य ठेवलं आहे. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना श्रीलंकेनं ९ गडी गमावून २४० धावा केल्या. भारतातर्फे वॉशिंग्टन सुंदरनं ३, तर कुलदीप यादवनं २ बळी घेतले.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा भारतानं ५ षटकात बिनबाद २९ धावा केल्या होत्या.

<><><><><>

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये आज पुरुष हॉकीच्या उपांत्यपूर्व फेरीत ग्रेट ब्रिटनचा पेनल्टी शूटआऊटमध्ये ४-२ अशा गोलफरकानं पराभव करून उपांत्य फेरीत प्रवेश केला. बॅडमिंटनमध्ये मात्र भारताच्या लक्ष्य सेनला उपांत्य फेरीत टोक्यो ऑलिम्पिकचा सुवर्णपदक विजेता व्हिक्टर ॲक्सेलसेन याच्याकडून थेट गेम्समध्ये पराभव पत्करावा लागला. दुसरीकडे महिलांच्या मुष्टियुद्ध स्पर्धेत उपांत्यपूर्व फेरीत ७५ किलो वजनी गटात चीनच्या ली क्वियान हिनं टोक्यो ऑलिम्पिकची पदकविजेती लोव्हलीना बोर्गोहाइन हिचा ४-१ असा पराभव केला. नेमबाजीत २५ मीटर जलद फायर पिस्तूल प्रकाराच्या पात्रता फेरीत अनीश भनवाला आणि विजयवीर सिद्धू लक्ष्याचा वेध घेण्याचा प्रयत्न करतील. महिलांच्या ३ हजार मीटर अडथळ्यांच्या शर्यतीच्या पहिल्या फेरीत पारूल चौधरी सहभागी होईल. पुरुषांच्या लांब उडी स्पर्धेत जेस्विन आल्ड्रिन मैदानात उतरेल.

<><><><><>